# औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, औरंगाबाद.

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची गुरुवार दिनांक २८. ६. ९० रोजी झालेल्या ५१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. श्री. ईश्वर भोसीकर | :- | सभापती/औरंगाबाद मंडळ. |
| २. श्री. अ. म. महाजन | :- | उपसभापती/औरंगाबाद मंडळ. |
| ३. श्री. बी. एन. माखिजा, आयुक्त, औरंगाबाद. | :- | सदस्य. |
| ४. श्री. पुरी उपायुक्त, महानगरपालिका, नासिक. | :- | सदस्य प्रतिनिधी |
| ५. श्री. जंबगी, कार्यकारी अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद. | :- | सदस्य प्रतिनिधी. |

विभागीय आयुक्त/नासिक व उपसंचालक नगर रचना, औरंगाबाद हे पूर्व सूचनेनुसार अनुपस्थित होते.

विषय क्र. १:- दिनांक ३०. ५. १९९० रोजी झालेल्या ५० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. २७६.

दिनांक ३०. ५. १९९० रोजी झालेल्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर सविस्तर चर्चा होऊन कायम करण्यांत आला.

विषय क्र. २:- खोब्रागडेनगर, नांदेड येथील झोपडपट्टी सुधार कामास प्रशासकीय मान्यता देणे बाबत.

ठराव क्र. २७७.

नांदेड नगरपरिषदेने खोब्रागडेनगर झोपडपट्टी सुधार कामास प्रशासकीय मान्यता मिळावी म्हणून पाठविलेल्या रु. ५, १५, ६३०/- रुपयाच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, नांदेड नगरपालिकेच्या हाती असलेल्या रु. ५. ६३ लक्षाच्या कामांना

प्राधान्य देण्याच्या अटीवर खोब्रागडेनगर झोपडपट्टी सुधार कामाच्या प्रस्तावास [ रु. ४,०१,३०९] मान्यता देण्यांत येत आहे.

विषय क्र. ३:- शासनाच्या आरक्षीत २५ कोटयामधून औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या सहयाद्रीनगर, [१५२ एमआयजी-२] मधील गाळा क्र. ७०४ च्या वाटपासाठी... श्री. राजेंद्र मु. बावीस्कर यांचा अर्ज.

ठराव क्र. २७८.

या बाब टिप्पणीवर चर्चा होऊन चर्चेअंती असा निर्णय घेतला की, श्री. बावीस्कर यांना मंडळासमोर बोलवावे व त्यांचे काय म्हणणे आहे ते ऐकून घ्यावे व नंतरच पुढील कार्यवाही बाबत निर्णय घ्यावा.

विषय क्र. ४:- विशेष नियोजन प्राधिकरण वाळूज क्षेत्रातील अनाधिकृत बांधकाम थांबविण्याकरिता नोटीस देणे बाबत.

या विषयावर चर्चा करतांना उप सभापती/औरंगाबाद मंडळ यांनी वाळूज विशेष नियोजन प्राधिकरण क्षेत्रातील अनाधिकृत बांधकाम करणारावर बजावलेल्या नोटीस बाबत मंडळाला माहिती दिली. तसेच नोटीस मिळाल्यानंतर कांही लोकांनी त्यांच्या बांधकामाबाबत मंडळाकडे अर्ज सादर केले. व त्यात कांही अर्जदारांनी बांधकाम परवानगी ग्रामपंचायतीकडून व अकृषी परवानगी तहसीलदार यांच्याकडून घेतली आहे, असे कळविले.

यावर उपसभापती, औरंगाबाद मंडळ यांनी मंडळाच्या सदस्यांना सविस्तर माहिती देतांना असे सांगितले की, अध्यक्ष व उपाध्यक्ष/प्राधिकरण हे औरंगाबाद येथे आले असता त्यांच्याशी ३.६.९८ रोजी चर्चा केली. असता त्यांनी असे सुचित केले की, प्रस्तावीत रचनात्मक आराखडा नकाशा जनतेसाठी प्रसिध्द करुन त्यांच्या हरकती व सूचना आल्यानंतर त्यांचा विचार करून नकाशा शासनास मंजूरीसाठी सादर केला जाईल तोपर्यंत कायदेशिर स्वरुप प्राप्त होणार नाही. तो पर्यंत परवानगी देता येणार नाही म्हणून नोटीसा देणे तुर्त थांबविण्यांत यावे.

यांना भूखंडाची किंमत भरण्याविषयी कळविले होते. परंतू त्यांनी अद्याप पैसे न भरल्यामुळे नगरपरिषद, मनमाड यांना शालेसाठी भूखंड वाटप करता आलेला नाही. त्यामुळे मनमाड वसाहतीतील शिक्षणाची व्यवस्था झालेली नाही. मनमाड येथील मंडळाचे गोदाम शाळा चालविण्यासाठी सत्यशोधक संस्था मनमाड यांनी मागणी केली आहे असे उपसभापतींनी सांगितले.

यावर चर्चा करतांना विभागीय आयुक्त/औरंगाबाद यांनी सत्यशोधक संस्था मनमाडची आर्थिक स्थिती तसेच, पंजीकृत आहे किंवा नाही असे विचारले व मनमाड नगरपरिषदेला शालेच्या भूखंडासाठी पुन्हा एकदा १५ दिवसाची संधी द्यावी जर पैसे भरले नाही तर जाहिरात देऊन शासन मान्य खाजगी शिक्षण संस्थेकडून मागणी बोलावून भूखंडाचे वाटप करावे.

ठराव क्र. २८०.

या बाब टिप्पणीवर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, मनमाड वसाहतीत शालेसाठी आरक्षित असलेल्या भूखंडाची किंमत त्वरीत भरण्याविषयी मनमाड नगरपरिषदेला कळविणे. १५ दिवसात पैसे भरले नाही तर रितसर वर्तमानपत्रात जाहिरात देऊन शासन मान्य खाजगी शिक्षण संस्थेकडून अर्ज बोलावून भूखंडाचे वाटप केले जाईल असे कळवावे. सत्यशोधक संस्था मनमाड यास वर्तमानपत्रात जाहिरात येईल तेंव्हा अर्ज करावा असे कळविणे.

विषय क्र. ६:- औरंगाबाद येथील विडी कामगाराकरिता बांधलेल्या ३०० गाळयांच्या वाटपा बाबत.

ठराव क्र. २८१.

या विषयावर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, औरंगाबाद येथील विडी कामगाराचे जवळ जवळ संपूर्ण अर्ज कागदपत्रासह मंडळाकडे प्राप्त झाले आहे. त्यामुळे प्रतिक्षा यादी तयार करण्यासाठी जाहिरात देऊ नये. व विडी कामगाराकडून आलेल्या अर्जाची छाननी "स्थानिक सल्लागार समितीकडून" करुन घेऊन नंतर मंडळाच्या प्राधिकृत अधिकाऱ्यामार्फत निश्चित करावयाची पात्रता, सोडत इत्यादी कामे त्वरीत करुन एक महिन्याच्या आंत सर्व अर्जदारांनी नांवासहीत यादी अनुदान प्राप्त करुन घेण्यासाठी प्राधिकरणामार्फत शासनाकडे पाठवावी.

विषय क्र. ७:- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने सुधारीत केलेल्या कर्मचारी आकृतीबंध[स्टॅफिंग पॅटर्न].

ठराव क्र. २८२.

या बाब टिप्पणीवर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, औरंगाबाद गृहनिर्माण मंडळास १९९०-९१ च्या स्टॅफिंग पॅटर्न प्रमाणे पदे मंजूर आहेत. परंतू नेमणुका झालेल्या नाहीत अशा पदासाठी कर्मचारी वर्ग देण्याविषयी त्वरीत प्राधिकरणास विनंती करावी. तसेचऔरंगाबाद गृहनिर्माण मंडळाच्या विस्तृत कार्यक्षेत्राचा विचार करुन कनिष्ठ अभियंते व उप अभियंते कमी मंजूर झाले आहेत. सबब मंजूर पदांचा फेरविचार करणे आवश्यक आहे. १९९०-९१ चे आकृतीबंधात मंजूरकेलेल्या पदाशिवाय उप अभियंते-३ व कनिष्ठ अभियंते ११, औरंगाबाद मंडळास देण्याविषयी प्रस्ताव प्राधिकरणास पाठवावा.

२] वाळूज विशेष नियोजन प्राधिकरणाचा रचनात्मक आराखडा नुकताच प्राधिकरणाने मंजूर केलेला आहे व तो जनतेच्या सूचना व हरकती ऐकुण घेण्यासाठी प्रसिध्द करण्यांत येणार आहे व त्यामुळे वाळूज विशेष नियोजन प्राधिकरणाचे काम फार वाढणार आहे. त्यासाठी स्वतंत्रपणे खालील प्रमाणे कर्मचारीवृंदाची आवश्यकता आहे. त्यासाठी सविस्तर प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठविण्याविषयी मंडळाने निर्णय घेतला.

| अ.क्र. पदनाम | पदांची संख्या |
|---|---|
| १. सहाय्यक संचालक नगररचना | १ |
| २. नगररचनाकार | १ |
| ३. सहाय्यक नगररचनाकार | १ |
| ४. रचना सहाय्यक | २ |
| ५. कनिष्ठ आरेखक | १ |
| ६. अनुरेखक | २ |
| ७. सर्व्हेयर | २ |
| ८. लघुटंकलेखक | १ |
| ९. कनिष्ठ लिपिक | १ |
| १० . वाहन चालक | १ |

| | | |
|---|---|---|
| ११. | शिपाई | १ |
| १२. | प्रशासकीय अधिकारी | १ |
| १३. | विधी सहाय्यक | १ |
| १४. | तांत्रिक सहाय्यक | १ |
| १५. | जप्तीदार | १ |
| १६. | बेलीफ | १ |
| | एकूण.. | २१ |

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळास आवश्यक असणारी वरील पदे व वाळूज विशेष नियोजन प्राधिकरणाकरिता वर उल्लेखीत केलेली पदे भरणे अत्यंत महत्वाचे असल्याने सदर प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठवावा व मा. सभापती यांनी प्राधिकरणाच्या स्तरावर पाठपुरावा करून पदे भरण्याविषयी मंजूरी आणावी.

मंडळाच्या बैठकी समोरील विषय संपल्यानंतर विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी २० कलमी कार्यक्रमाविषयी विचारणा केली व मंडळा अंतर्गत चालू असलेल्या गृहनिर्माण योजनेच्या कामाविषयी मंडळाच्या अधिकाऱ्यांना विचारणा केली. त्यावर उपसभापती तथा मुख्य अधिकारी यांनी सिडको, गारखेडा, देवगिरी कॉलेज, गृहनिर्माण भवनाजवळील योजनेची माहिती दिली.

गृहनिर्माण भवनाजवळील मध्यम व उच्च उत्पन्न गट गृहनिर्माण योजनेचे काम प्रगतीपथावर असून येत्या तीन चार महिन्यात गाळे वाटपास उपलब्ध होतील अशी माहिती दिली. परंतू या योजनेसाठी पाणीपुरवठा महानगरपालिका, औरंगाबादकडून वेळेवर न झाल्यास गाळे तयार होऊनही वाटप करता येणार नाही असे उपसभापती यांनी सांगितले. यावर विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी अशी सूचना केली की, पाणीपुरवठा व इत्यादी अडचणीबाबत मंडळाच्या पुढील बैठकीत विषय ठेवावा.

बैठक संपल्यानंतर मा. सभापती यांनी सदस्यांचे व सदस्यांनी सभापतींचे आभार मानले.

गा/२१७९०.